# पुणेरी पलटनचं टॉप ८ मध्ये स्थान पक्क! तमिळ थलायवाजला मिळवला १३ गुणांनी विजय

दिल्ली, ११ ऑक्टोबर २०२५: प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील ७८ वा सामना पुणेरी पलटन आणि तमिळ थलायवाज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पुणेरी पलटनने ३६- २३ ने विजय मिळवला.

त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात पुणेरी पलटनकडून पंकज मोहितेने सर्वाधिक ९ गुणांची कमाई केली. तर अस्लम इनामदारने ७ गुणांची कमाई केली. तमिळ थलायवाजकडून अर्जुन देशवालला अवघे ६ गुणांची कमाई करता आली.

या सामन्यात तमिळ थलायवाजकडून अर्जुन देशवाल पहिली चढाई करण्यासाठी आला. पहिल्याच चढाईत त्याने १ गुण घेत संघाचं खातं उघडलं. तर पुणेरी पलटनकडून अस्लम इनामदार चढाईला आला आणि पहिल्याच चढाईत त्याने बोनस घेत संघाचं खातं उघडलं. तिसऱ्याच मिनिटाला अस्लम इनामदारने हनुमान उडी घेत २ गुणांची कमाई केली. सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे ५-१ गुणांसह ४ गुणांची आघाडी होती. ७ व्या मिनिटाला तमिळ थलायवाजचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह १०-१ गुणांसह ९ गुणांची आघाडी घेतली.

तमिळ थलायवाजला सुरुवातीच्या १० मिनिटात अवघ्या ३ गुणांची कमाई करता आली. पुणेरी पलटनने १२- ३ गुणांसह ९ गुणांची आघाडी घेतली. सुरूवातीच्या १० मिनिटात पिछाडीवर राहिलेल्या तमिळ थलायवाजने पुढील १० मिनिटात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला . शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे ७ गुणांची आघाडी होती. २० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनने २०-११ गुणांसह आपली आघाडी कायम ठेवली.

उत्तरार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत रंगली. सुरुवातीची ८ मिनिटे झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ २३-१६ गुणांसह ७ गुणांनी आघाडीवर होता. पूर्वार्धातील सुरुवातीचा १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे २५- १६ गुणांसह ९ गुणांची आघाडी होती.

शेवटच्या १० मिनिटात पुणेरी पलटनला ९ गुणांची आघाडी टिकवून ठेवायची होती. पुणेरी पलटनने अर्जुन देशवालला शेवटपर्यंत शांत ठेवलं. चढाईत अस्लम इनामदारला फार गुण घेता आले नाही, पण बचावत त्याने आपलं योगदान दिलं. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनचा संघ ३१-२१ गुणांसह १० गुणांनी आघाडीवर होता. शेवटच्या मिनिटाला बंगाल वॉरियर्सला ऑलआऊट करत पुणेरी पलटनने हा सामना ३६-२३ सह आपल्या नावावर केला.